**<u>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, लोहमार्ग न्यायालय, दौंड, जि. पुणे यांचे न्यायालयात</u>**

**<u>गुन्ह्याचा तपशील</u>**

**सं.फौ.ख.नं. ५८०/२०२६ (गु.र.क्र.५४६/२०२६)** **निशाणी क्र.०२**

**आर.पी.एफ. दौंड विरुध्द दिनेश दत्तात्रय जाधव,**

| | | |
|---|---|---|
| १. | अपराध घडल्याची तारीख | **: ०६.०३.२०२६** |
| २. | अहवालाचा/फिर्यादची तारीख | **: ०६.०३.२०२६** |
| ३. | फिर्यादीचे नांवः | **: आर. के. पाल, निरीक्षक, आरपीएफ दौंड, जि. पुणे.** |
| ४. | आरोपीचे नांवः | **: दिनेश दत्तात्रय जाधव,**<br>**वयः २० वर्षे, धंदा– मजुरी,**<br>**पत्ताः झोपडपट्टी गिरीम, ता. दौंड, जि. पुणे.** |

५. गुन्ह्याचा तपशील –

तुम्ही दिनांक ०६.०३.२०२६ रोजी रात्री ०७.५८ ते ०८.०२ वाजण्याच्या दरम्यान गाडी क्र.१२६२८ मधुन प्रवास करीत असतांना वैध कारणाशिवाय अलार्म चैन ओढले व भारतीय रेल्वे अधिनियम, १९८९ चे कलम १४१ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याची तोहमत तुमच्यावर आहे.

प्रश्न क्र.१: तुम्हाला दोषारोप पत्राच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तरः होय.

प्रश्न क्र.२: तुम्हाला आता आरोप वाचुन दाखविला व समजावुन सांगितला तो समजला काय ?

उत्तरः होय.

प्रश्न क्र.३: तुम्हाला गुन्हा कबुल आहे ?

उत्तरः होय, स्वतःच्या इच्छेने गुन्हा कबुल करीत आहे.

स्थळः दौंड.

दिनांकः ०९.०३.२०२६. समक्ष,

Jadhav
---------------
आरोपीची सही

9/3/26

प्रभारी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लोहमार्ग न्यायालय, दौंड, जि. पुणे.

## कारणमिमांसा

आरोपीला त्याच्यावर असलेला दोषारोप वाचुन दाखविले असता, त्याने गुन्हा स्वेच्छेने कबुल केला आहे. शिक्षेबाबत आरोपीला विचारले असता, त्याने असे निवेदन केले की, तो गरीब असुन कुटुंबातील एकमेव कमवता व्यक्ती असुन कुटूंबाची पालनपोषणाची जबाबदारी आरोपीवर आहे. त्यामुळे, शिक्षा देताना कमीत कमी दंड करावा अशी विनंती केली आहे. आरोपीने स्वेच्छेने गुन्हा कबुल केल्यावरुन असे स्पष्ट होते की, त्याला त्याच्या कृतीबाबत पश्चाताप होत आहे. आरोपीचे वय, गुन्ह्याचे स्वरुप विचारात घेता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करणे न्यायोचित होईल या तथ्यविषयक व विधिविषयक निष्कर्षास मी येत आहेः

## आदेश

आरोपी नामे **दिनेश दत्तात्रय जाधव** यास भारतीय रेल्वे अधिनियम, १९८९ चे कलम १४१ अन्वये शिक्षापात्र असणाऱ्या गुन्ह्यांसाठी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ अन्वये दोषी धरण्यात येते व आरोपीला एकुण रक्कम रुपये १,०००/- (रुपये एक हजार फक्त) द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येते. आरोपीने उपरोक्त द्रव्यदंडाची रक्कम भरण्यास कसुर केल्यास आरोपीस पाच दिवसाची साध्या कैदेची शिक्षा ठोठावण्यात येते.

9/3/26

स्थळः दौंड,

दिनांकः ०९.०३.२०२६.

प्रभारी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लोहमार्ग न्यायालय, दौंड, जि. पुणे.

केस नं. 580/26
दंड रक्कम रु 1000/-
पावती नं. 3599 ने जमा

सहा. अधिक्षक
लोहमार्ग न्यायालय, दौंड